| MHYA210004262013 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २८/०३/२०१३ |
| | नोंदणी तारीख | २८/०३/२०१३ |
| | निकाल तारीख | ०२/०७/२०२६ |
| | कालावधी | १३ **व.** ०३ **म.** ०४ **दि.** |

**प्रपत्र–अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, वणी, ता.वणी, जि.यवतमाळ यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी **शहाजी दत्तराव भोसले**)

(न्या.अ.सांकेतांक क्र.एम.एच.०२८७३)

**न्यायनिर्णय दि.०२/०७/२०२६**

**नि.फौ.ख.क्र.३५/२०१३** **नि.क्र.२९**

(प्रथम खबरी अहवाल तपशील: गुन्हा क्र.५१/२०१३, पोलीस ठाणे, **वणी,** ता.वणी, जि.यवतमाळ)

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार,**<br>तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे, **वणी,**<br>ता.वणी, जि.यवतमाळ. |
| **मार्फत** | विद्वान सहायक सरकारी वकील : श्रीमती एम.डी.वायचाळ. |
| **आरोपी** | **संतोष शेषराव पोटे,**<br>वयः ३७ वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>रा.गोकुळनगर, वणी, ता.वणी, जि.यवतमाळ, |
| **मार्फत** | विद्वान वकील श्री.एन.बी.चंदणे. |

**प्रपत्र–ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | ०१/०३/२०१३ |

| | |
|---|---|
| प्राथमिक खबरी अहवाल दिनांक | ०१/०३/२०१३ |
| दोषारोप पत्राचा दिनांक | २८/०३/२०१३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २५/०७/२०१३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५/०९/२०१३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| सजा सुनावणीचा दिनांक, जर असेल | निरंक. |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| अ. क्र. | नाव | अटक दिनांक | जमानत दिनांक | शिक्षा कलमे | निर्दोष/ शिक्षा | आरोपीस दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता आरोपीचा कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष शेषराव पोटे | ०२/०३ /२०१३ | २१/०३ /२०१३ | भा.दं.वि. कलम ३२६, ५०६ | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. | निरंक | निरंक |

**<u>प्रपत्र–क</u>**

**<u>अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाचे साक्षीदार</u>**

**अ. अभियोग पक्ष :**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | संदीप ताराचंद गजर, नि.क्र.१८ | घटनास्थळ पंच |
| अ.सा.क्र.२ | शांताबाई मनोहर साळुंखे, नि.क्र.२४ | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र.३ | कविता उर्फ रंजना धनराम गजर, नि.क्र.२५ | साक्षीदार |

**ब.बचाव पक्षाचे साक्षीदार :– निरंक.**

**क.न्यायालयाचे साक्षीदार :– निरंक.**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाचे निशाणी क्रमांकः**

**अ. अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**ब.बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**क.न्यायालयाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**ड. वस्तु :– निरंक.**

## न्यायनिर्णय

(दि.०२/०७/२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२६, ५०६ अन्वये चालविण्यात आला. (यापुढे संक्षेपार्थ "भा.दं.वि."असे संबोधण्यात येते.)

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. फिर्यादी शांताबाई सुनिल गदईकर यांनी पोलीस ठाणे, वणी येथे फिर्याद दिली की, ती भाजीपाला विक्री करते. तिचे पती सुनिल गदईकर हे नंदी बैल फिरवुन भिक्षा मागतात. आरोपी हा त्यांचे मोहल्लयात राहतो. दि.०१/०३/२०२३ रोजी ०६.०० वाजता फिर्यादीचे पती आरोपीचे घराजवळ असलेल्या दगडावर बसण्यासाठी गेले. तेव्हा आरोपी व त्याचा मुलगा मारोती यांनी फिर्यादीचे पतीसोबत वाद करुन त्यांना मारहाण केली. त्यानंतर, फिर्यादी तिचे पतीला घेवून घरी गेली. तेव्हा आरोपी कुऱ्हाड घेवून फिर्यादीचे घरी आला व त्याने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर कुऱ्हाडीने मारले. तेव्हा, फिर्यादी ओरडली असता तेथे फिर्यादीची ननंद कवडाबाई गजर आली. त्यावेळी फिर्यादीचे पतीचे डोके फुटुन रक्त निघाले व तो रोडवर बसला होता. त्याठिकाणी आरोपी व त्याचा मुलगा मारोती हे आले व त्यांनी फिर्यादीचे

पतीला काठीने पाठीवर व दोन्ही भुजेवर मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर, फिर्यादी व तिची ननंद कवडाबाई यांनी फिर्यादीचे पतीला ऑटोमध्ये टाकून पोलीस ठाण्यात आणले व नंतर दवाखाण्यात नेले. त्यानंतर, फिर्यादीची आत्या शांताबाई साळुंखे (सा.क्र.२) ही तेथे आली. तिला देखील आरोपीने शिवीगाळ केली.

३. फिर्यादीचे वरील फिर्यादवरुन आरोपी व त्याचे मुलाविरुध्द पोलीस ठाणे, वणी, येथे अपराध क्र.५१/२०१३ नुसार भा.दं.वि.चे कलम ३२६, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हाचा तपास सहा.फौजदार रामभाउ बेंडे यांचेकडे वर्ग करण्यात आला. तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान जखमीला वैद्यकीय तपासणीकरीता पाठविले, त्याचे वैद्यकीय कागदपत्र हस्तगत केले, पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, जप्त मुद्देमालाची क्युरी करुन घेतली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीला अटक केली आणि तपासाअंती आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे उपरोक्त कलमान्वये दोषारोप पत्र दाखल केले. आरोपीचा मुलगा हा अल्पवयीन असल्यामुळे त्याचेविरुद्ध बाल न्याय मंडळ, यवतमाळ येथे वेगळे दोषारोप पत्र सादर केले.

४. माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२५/०७/२०१३ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.१६ वर भा.दं.वि. कलम ३२६, ५०६ अन्वये दोषारोप ठेवले. त्यातील मजकुर आरोपीला त्याचे मातृभाषेतुन वाचून व समजावून सांगीतला. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीविरुध्द सकृतदर्शनी पुरावा आला नसल्यामुळे त्याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी नोंदविण्यात आली नाही. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५. खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०१/०३/२०१३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता गोकुळनगर, वणी, ता.वणी येथे आरोपीने विधी संघर्षग्रस्त बालकासोबत फिर्यादीचे पतीला कुऱ्हाड व काठीने डोक्यावर, पाठीवर व भुजावर मारहाण करुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने विधी संघर्षग्रस्त बालकासोबत फिर्यादीचे पतीला जिवे मारण्याची धमकी देवुन दहशत निर्माण केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |
| ३. | आदेश काय ? | .. अंतिम आदेशाप्रमाणे |

६. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने प्रपत्र–क प्रमाणे केवळ तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यांनी अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा दिला नाही. तसेच, फिर्यादी व जखमी यांचा ठावठिकाणा मिळून आला नाही. त्याचप्रमाणे, इतर साक्षीदारांना साक्ष समंस काढून देखील ते न्यायालयात हजर झाले नाहीत. सदर प्रकरण हे १३ वर्षापेक्षा जास्त जुने असल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीने त्याचे बचावाकरीता पुरावा दिला नाही.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता –**

७. वरील मुद्दे एकाच घटनेशी संबंधीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती

टाळण्याकरीता मी त्यांचे एकत्रीत विवेंचन करीत आहे. अभियोग पक्षास आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी हे सिद्ध करावे लागेल की, आरोपीने विधी संघर्षग्रस्त बालकासोबत फिर्यादीचे पतीला कुऱ्हाड व काठीने डोक्यावर, पाठीवर व भुजावर मारहाण करुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी देवुन दहशत निर्माण केली. त्यासाठी, अभियोग पक्षास फिर्यादी, पंच, प्रत्यक्षदर्शी, वैद्यकीय अधिकारी व तपास अधिकारी यांचे पुराव्याची मदत घ्यावी लागेल.

८. सा.क्र.२/शांताबाई साळुंखे यांनी कथन केले आहे की, फिर्यादी व जखमी त्यांचे बहीनीचा मुलगा व सुन आहेत. एकेदिवशी त्यांचे बहीनीचा मुलाचा आरोपीसोबत शाब्दीक वाद झाला होता. त्यावेळी, तो खाली पडला व जखमी झाला. तसेच, सा.क्र.३/कविता उर्फ रंजना गजर हिने कथन केले आहे की, जखमी व फिर्यादी त्यांचा भाउ व वहिनी आहेत. अंदाजे १०–१२ वर्षापूर्वी त्यांचे भावाचा आरोपीसोबत दारुचे कारणावरुन वाद झाला होता. त्यावेळी, त्यांचा भाउ खाली पडला व त्याला मार लागला. त्याचप्रमाणे, सा.क्र.१/पंच संदीप गजर यांनी केवळ घटनास्थळ पंचनाम्यावरील सही मान्य केली व इतर मजकुर स्पष्टपणे नाकारला. वरील सर्व साक्षीदारांनी अभियोग पक्षाचे कथनास सहकार्य केले नाही. त्यामुळे, विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना सुचक प्रश्न विचारले, परंतु त्यांनी अभियोग पक्षाचे कथन स्पष्टपणे नाकारले.

९. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी व जखमी यांचेमध्ये शाब्दीक वाद झाला होता. त्यादरम्यान जखमी खाली पडला व त्याला मार लागला. आरोपीने जखमीला मारहाण केली नाही. तसेच, जिवे मारण्याची धमकी दिली नाही. तसेच, सा.क्र.२/शांताबाई साळुंखे व सा.क्र.३/कविता उर्फ रंजना गजर हे फिर्यादी व जखमी यांचे जवळचे नातेवाईक

आहेत. परंतु, त्यांनी आरोपीविरुद्ध कोणतेही कथन केले नाही. त्यामुळे, वादातील घटना घडली नसल्याचे दिसून येते. सबब, त्यांचा पुरावा अभियोग पक्षास काहीएक उपयोगाचा ठरत नाही. तसेच, सा.क्र.१/पंच संदीप गजर यांनी आरोपीविरुद्ध कोणतेही कथन केले नाही. त्यामुळे, त्यांचा पुरावा अभियोग पक्षास काहीएक कामाचा ठरत नाही.

१०. अभियोग पक्षाने प्रकरणातील इतर साक्षीदारांना वारंवार समंस काढुन न्यायालयासमक्ष हजर ठेवले नाही. तसेच, प्रकरणातील फिर्यादी व जमखी हे वणी शहर सोडून गेले आहेत. त्यांचा ठावठिकाणा मिळून आला नाही. त्यामुळे, अभिलेखावर त्यांचा पुरावा विवंचनेकरीता उपलब्ध नाही. वर कथन केल्याप्रमाणे आरोपीविरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. अशा परिस्थीतीमध्ये, आरोपीवरील दोषारोप निर्विवादपणे सिध्द होत नाहीत. म्हणुन, मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र.३ करीता –**

११. मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष लक्षात घेता, आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. प्रकरणातील जप्त एक लोखंडी कुऱ्हाड दांड्यासह व एक लाकडी काठी मुल्यहीन असल्यामुळे ते अपील कालावधीनंतर नष्ट करणे न्यायोचीत ठरेल. आरोपीला यापुर्वीच फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यात आला आहे. माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे फौजदारी अपिल क्र.३९०/२०१९, रंजना शांतीलाल सुर्यवंशी–विरुध्द–जयप्रकाश तुळशीराम गुप्ता व इतर मधील फौजदारी अर्ज क्र.३८०/२०१९ वर पारित केलेल्या आदेशाप्रमाणे सदर न्यायनिर्णयाची प्रत फिर्यादीस त्यांचे अपील अधिकाराचे माहितीकरीता जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेद्वारे पाठविणे उचीत ठरेल. सबब, मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष लक्षात घेता, मुद्दा क्र.३ चे निष्कर्षात मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीची भारतीय दंड विधानाचे कलम ३२६, ५०६ चे शिक्षापात्र गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

३. जप्त एक लोखंडी कुऱ्हाड दांड्यासह व एक लाकडी काठी अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यात आला.

५. सदर न्यायनिर्णयाची प्रत मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना अग्रेषित करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषित करण्यात आला.)

SHAHAJI DATTARAO BHOSLE

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE
Date: 2026.07.02 18:32:34 +0530

**(शहाजी दत्तराव भोसले)**

दि.०२/०७/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

न्यायालय क्र.१, वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.